# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ

(स्वायत्त) (ISO ९००१:२०१५) (ISO/IEC २७००१:२०१३)

शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४ था मजला, ४९, खेरवाडी, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१

दू.क्र.: ०२२-६२५४२१००/११०/१७२

संकेतस्थळ : www.msbte.org.in ई-मेल : director@msbte.com


जा.क्र. मरातंशिमं/का-४०/लले/उ.प.२०/२०२०/०५e दि. 10 SEP 2020

**महत्वाचे परिपत्रक**

प्रति,

प्राचार्य,

मंडळाशी संलग्नीत सर्व संस्था.

**विषय :- अंतीम सत्र / वर्ष विद्यार्थ्यांच्या उन्हाळी परीक्षा २०२० च्या आयोजनाबाबत.**

संदर्भ :- १. मंडळाचे महत्वाचे परिपत्रक जा.क्र.मरातंशिमं/का-२०/परीक्षा२०२०/८३ दि. १५.०५.२०२०.
२. मंडळाच्या विद्वत समितीची बैठक दि. ०५.०९.२०२०.

महाराष्ट्र तंत्र शिक्षण मंडळाशी संलग्नीत पदविका अभ्यासक्रमाच्या उन्हाळी २०२० परीक्षेचे नियोजन व शैक्षणिक वेळापत्रकाबाबत सर्व संस्थांना, विद्यार्थी व पालकांना उपरोक्त संदर्भ क्र. ०१ च्या परिपत्रकान्वये कळविण्यात आले होते. अंतीम सत्र/वर्ष विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेण्याबाबत मा.कुलगुरू, मुंबई विद्यापीठ यांच्या अध्यक्षतेखालील समितीचा दि. ०२.०९.२०२० चा अहवाल तसेच मा.शिक्षण संचालक, उच्चशिक्षण यांचे दि. ०३.०९.२०२० चे अंतीम सत्र / वर्षाच्या परीक्षा नियोजनाबाबतचे निर्देश विचारात घेवुन मंडळाने अंतीम सत्र / वर्ष विद्यार्थ्यांच्या परीक्षांची रुपरेषा व कार्यपध्दती ठरविण्याकरिता मंडळाच्या विद्वत समितीची बैठक दि. ०५.०९.२०२० रोजी आयोजीत करण्यात आली होती. उपरोक्त नमुद निर्देशाच्या अनुषंगाने विद्वत समितीच्या शिफारशी व मान्यतेने अंतीम सत्र / वर्ष विद्यार्थ्यांच्या परीक्षेबाबतच्या ठळक बाबी मंडळाशी संलग्नीत सर्व संस्था, विद्यार्थ्यांना व पालकांना माहिती व कार्यवाहीसाठी कळविण्यात येत आहे.

१. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद मान्यताप्राप्त (अभियांत्रिकी व औषधनिर्माण) तसेच शासन मान्यताप्राप्त अल्पमुदतीच्या अभ्यासक्रमातील अंतीम सत्र / वर्ष विद्यार्थ्यांची प्रात्यक्षिक परीक्षा ऑनलाईन प्रणालीचा वापर करुन तोंडी पध्दतीने संस्थास्तरावर घेण्यात यावी. याकरिता विविध मिटींग ॲप्लिकेशनचा वापर करुन प्रात्यक्षिक परीक्षा घेण्यात यावी. शक्य नसल्यास टेलीफोनिक पध्दतीने सदर प्रात्यक्षिक परीक्षा संस्थास्तरावर घेण्यात यावी. वरील सर्व प्रयत्नांनंतरही विद्यार्थ्यांची प्रात्यक्षिक परीक्षा घेणे शक्य नसल्यास अशा विद्यार्थ्यांचे सत्रकर्म, जर्नल्स, निरंतर मुल्यमापन या अधारावर मुल्यमापन करुन गुण देण्यात यावेत.

२. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद मान्यताप्राप्त (अभियांत्रिकी व औषधनिर्माण) अभ्यासक्रमातील अंतीम सत्र / वर्षातील विद्यार्थ्यांची लेखी परीक्षा Multiple Choice Question (MCQ) वापरुन ऑनलाईन पध्दतीने मंडळस्तरावरुन घेण्यात येईल. सदर परीक्षा विद्यार्थी Smart Mobile Phone/Laptop/Tablet/Desktop इत्यादीचा वापर करुन सद्यपरिस्थीत ज्याठिकाणी वास्तव्यास आहेत त्याठिकाणाहुन देवु शकतील. सदर परीक्षेत विद्यार्थ्यांना ४० पैकी ३० प्रश्न सोडविणे आवश्यक आहे. प्रत्येक प्रश्न ०१ गुणाचा असेल व सदर परीक्षेचा कालावधी ०१ तासाचा असेल. सदर ४० प्रश्न संपुर्ण अभ्यासक्रमावर आधारीत असतील. ऑनलाईन परीक्षेचे सविस्तर वेळापत्रक व परीक्षेच्या कार्यप्रणालीबाबतच्या मागदर्शक सुचना विद्यार्थ्यांना व संस्थांना स्वतंत्रपणे देण्यात येतील. Architectural Assistantship(AA6G) (Paper Code- 19601). Chemical Engineering (CH6G) (Paper Code-17647). Chemical Engineering (CH6I) (Paper Code-22608) या विषयांच्या अभ्यासक्रमात Drawing चा समावेश असल्याने या विषयांची परिक्षा MCQ वापरुन

घेणे शक्य नाही. सदर विषयांची परीक्षा सत्रकर्म/अभ्यासक्रमावर आधारीत सादरीकरणाद्वारे ऑनलाईन पध्दतीने संस्थास्तरावर घेण्यात यावी. सदर सादरीकरण तसेच तोंडी प्रश्नोत्तरांच्या आधारे परिक्षक मुल्यांकन करतील.

३. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद मान्यताप्राप्त (अभियांत्रिकी व औषधनिर्माण) तसेच शासन मान्यताप्राप्त अल्पमुदतीच्या अभ्यासक्रमाचा दि. १३.०३.२०२० पर्यंत सर्वसाधारणपणे सरासरी ९०% अभ्यासक्रम शिकविणे पुर्ण झाला आहे ही बाब विचारात घेता विद्यार्थी हितास्तव विद्यार्थ्यांना प्राप्त होणारे थेअरी विषयांचे गुण एकुण गुणांच्या ९० % पैकी प्राप्त झाल्याचे गृहीत धरुन सदर गुण १०० % पैकी रुपांतरीत करण्यात येतील.

४. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद मान्यताप्राप्त (अभियांत्रिकी व औषधनिर्माण) अभ्यासक्रमातील अंतीम सत्र / वर्षातील विद्यार्थ्यांचे निम्नसत्र/वर्षातील (Lower Semester/year) म्हणजेच सहा सत्र अभ्यासक्रमाच्या ५,४,३ सत्रातील ,आठ सत्र अभ्यासक्रमाच्या ७,६,५ सत्रातील, दोन वर्ष वार्षीक अभ्यासक्रमाच्या पहिल्या वर्षातील तसेच तीन वर्ष वार्षीक अभ्यासक्रमाच्या दुसऱ्या वर्षातील असलेल्या बॅकलॉग विषयाची परीक्षा संस्था स्तरावर ऑनलाईन पध्दतीने Multiple Choice Question (MCQ) स्वरुपात घेण्यात यावी. ऑनलाईन पध्दतीने परीक्षा घेणे शक्य न झाल्यास संस्थांनी सदर परीक्षा ऑफलाईन पध्दतीने MCQ स्वरुपात घ्यावी. संस्थांनी याबाबतचे वेळापत्रक तयार करुन ते विद्यार्थ्यांना अवगत करावे. याबाबत संस्थांना स्वतंत्रपणे मार्गदर्शक सुचना देण्यात येतील.

५. शासन मान्यताप्राप्त अल्पमुदतीच्या अभ्यासक्रमातील अंतीम सत्र / वर्षातील ( नियमित विद्यार्थी व बॅकलॉग विद्यार्थी ) तसेच त्यांचे निम्नसत्रातील/वर्षातील (Lower Semester/year) असलेल्या बॅकलॉग विषयांची लेखी परीक्षा संस्था स्तरावर ऑनलाईन पध्दतीने Multiple Choice Question (MCQ) चा वापर करुन किंवा ऑनलाईन सादरीकरण पध्दतीने किंवा Assignment पध्दतीचा वापर करुन घ्यावी. संस्थेने याबाबत वेळापत्रक तयार करुन विद्यार्थ्यांना त्याची माहिती द्यावी व मार्गदर्शन करावे.

६. ज्या विद्यार्थ्यांकडे ऑनलाईन लेखी परीक्षेकरिता इंटरनेट, संगणक, मोबाईल इ. सुविधा उपलब्ध नाहीत अथवा उपलब्ध होऊ शकणार नाहीत अशा विद्यार्थ्यांकरिता शेवटचा पर्याय म्हणुन ऑनलाईन परीक्षा नजिकच्या तंत्रनिकेतनात घेण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात येईल. याकरिता नियोजन करण्याची सर्वस्वी जबाबदारी विद्यार्थी प्रवेशित असलेल्या संबंधीत संस्थेची असेल.

७. जे विद्यार्थी अपवादात्मक परिस्थितीत संस्थेत येऊन परीक्षा देतील त्यावेळी संस्था व विद्यार्थ्यांनी कोव्हिड-१९ बाबतच्या केंद्र व राज्यशासनाच्या सर्व मार्गदर्शक सुचनांचे काटेकोर पालन करावे.

८. जे विद्यार्थी ऑनलाईन परीक्षा काही अपरिहार्य कारणामुळे देवु शकणार नाहीत अशा विद्यार्थ्यांना पुन्हा परीक्षा देण्याची एक संधी देण्यात येईल.

९. दिव्यांग विद्यार्थ्यांकरिता नियमानुसार परीक्षेकरिता अधिकचा वेळ देण्यात येईल व संस्थांमार्फत अशा विद्यार्थ्यांना सोयीसुविधा पुरविण्यात याव्यात.

१०. अंतीम सत्र/वर्षातील ONSRA/C/E या जुन्या Scheme मधील विद्यार्थ्यांना लेखी परीक्षेकरिता G-Scheme मधील समकक्ष विषयाचा कोड (Equivalent Paper Code)देण्यात आले आहेत. देण्यात आलेले G-Scheme मधील समकक्ष विषयाचे कोड अंतीम सत्र/वर्षातील असल्यास अशा विद्यार्थ्यांची परीक्षा मंडळस्तरावर

ऑनलाईन MCQ द्वारे घेण्यात येईल. तसेच G-Scheme मधील समकक्ष विषयाचा कोड निम्न सत्र/वर्षातील (Lower Semester/ year) अशा विषयांची परीक्षा संस्था स्तरावर घेण्यात येईल.

११. मंडळस्तरावर तसेच संस्था स्तरावर घेण्यात येणाऱ्या उन्हाळी परीक्षा २०२० चे स्वरुप ऑनलाईन पध्दतीने असल्यामुळे, परीक्षा विषयक नियमावलीतील RG11K नुसार Photocopy/Verification and Reassessment ची सुविधा उन्हाळी परीक्षा २०२० परीक्षेकरिता देण्यात येणार नाही.

१२. परीक्षेबाबत ठळक वेळापत्रक खालीलप्रमाणे घोषीत करण्यात येत असुन मंडळस्तरावर घेण्यात येणाऱ्या परीक्षांचे सविस्तर वेळापत्रक नंतर जाहीर करण्यात येईल.

| **AICTE Approval Diploma Courses and Pharmacy** | | |
|---|---|---|
| Sr. No. | Activity | Schedule |
| 01. | Conduction of practical / Oral Examination for final semester / year student at institute level. | 15 – 25 September 2020 |
| 02. | Conduction of theory / Practical / Oral Examinations of Backlog courses of final semester / year students at institute level. | 25 September – 04 October 2020 |
| 03. | Conduction of Theory Examination for Final semester / year students at MSBTE level. | 05 – 15 October 2020. |
| 04. | Declaration of Result | 31st October 2020 (Tentatively) |

| **State Government approved Short term Courses ( Non- AICTE)** | | |
|---|---|---|
| Sr. No. | Activity | Schedule |
| 01. | Conduction of practical / Oral Examination for final semester / year student along with backlof if any at institute level. | 15 – 25 September 2020 |
| 02. | Conduction of theory Examinations for final semester / year students along with backlog if any at institute level. | 25 September – 04 October 2020 |
| 03. | Declaration of Result | 31st October 2020 (Tentatively) |

१३. मंडळाच्या परीक्षा विषयक नियमावलीनुसार परीक्षेबाबतचे सर्व Records संस्थांनी त्यांचे स्तरावर जतन करुन ठेवावे.

१४. संस्थेच्या प्राचार्यांनी अंतीम सत्र / वर्ष विद्यार्थ्यांची उन्हाळी परीक्षा २०२० करिता वरील सर्व बाबी विद्यार्थी व त्यांचे पालक यांना अवगत करुन द्याव्यात. तसेच विद्यार्थ्यांना परीक्षांबाबत मार्गदर्शन करावे. परीक्षा सुरळीतपणे व विहीत कालावधीत पार पडेल याची दक्षता घेवुन आवश्यक ती कार्यवाही करावी. परीक्षा सुरळीतपणे पार पाडण्याची जबाबदारी सर्वस्वी संस्थेच्या प्राचार्यांची राहील याची नोंद घ्यावी.

(डॉ. विनोद म. मोहितकर)
संचालक,
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई

प्रत माहितीकरिता :-

१. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. सहसंचालक, तंत्रशिक्षणाचे विभागीय कार्यालय मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद,अमरावती, नागपुर.

प्रत माहिती व कार्यवाहीकरिता:-

१. प्राचार्य, सर्व स्वायत्त संस्था.
२. उपसचिव, विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नागपुर , औरंगाबाद.